# समर्थन

## खर्चाचे पूरक विवरणपत्र विश्लेषण

### विभाग निहाय

### जुलै, २०१७

(महाराष्ट्र राज्य)

**समर्थन**

११५, धुरी कॉमर्स प्लाझा, वसई रोड स्थानकासमोर,
वसई (पू), पालघर -४०१ २०८ ✆ ०२५०-२३९०१०३/४
**विश्लेषक : रुपेश किर : ९८९२९३९६१७/७३८७२७०५३३**
✉: samarthanmumbai97@gmail.com
www.samarthanadvocacy.org

# पावसाळी अधिवेशन - जुलै २०१७

## खर्चाचे पूरक विवरणपत्र २०१७-१८

**ठळक वैशिष्टे:**

- जुलै, २०१७ मध्ये रु.३३ हजार ५३३ कोटी ८५ लाखांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आलेल्या आहेत. मुळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत या पूरक मागणीचे प्रमाण ११.१६ टक्के आहे.
- मार्च २०१७ मध्ये शासनाने सादर केलेला अर्थसंकल्प (मुळ मागणी) रु. ३ लाख ३९७ कोटींचा होता. जुलै, २०१७ मध्ये सादर केलेल्या पूरक मागण्या मिळून रु. ३ लाख ३३ हजार ९३० कोटी ८५ लाख झाला आहे.
- सहकार, पणन व वस्त्रोद्योग व आदिवासी विकास विभागांतर्गत २० हजार कोटी रुपये 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना, २०१७' म्हणजे शेतकरी कर्जमाफी साठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. एकूण पुरवणी मागणीमध्ये ही रक्कम ५९.६४ टक्के आहे.
- अनुसूचित जाती उपयोजना शीर्ष '७८९'चा वापर करून सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या २४३५-इतर कृषि विषयक कार्यक्रम या मुख्य शिर्षाच्या आधारे अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली आहे. कारण शीर्ष '७८९' हा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा भाग आहे. त्यामुळे या मागणीमुळे अर्थसंकल्पीय वितरण निधी नियमांचा भंग झाला आहे. १००० कोटी रुपयांची रक्कम सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातून वळवली जाणार आहे. जरी याचा लाभ अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना मिळणार असला तरी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या इतर योजनांना काट लावली जाणार आहे.
- आदिवासी विकास विभागाच्या मागणी क्र. टी-५ भाग-२ खर्चाचे तपशीलवार अंदाज पाहिले असता असे दिसून येते की, मुख्य शीर्ष २४३५, इतर कृषि विषयक कार्यक्रम, याचा समावेश या विभागाच्या अंदाज पत्रकात नाही, त्याचा या पुरवणी मागणीच्या निमित्ताने आदिवासी विभागात नव्याने समावेश करण्यात येणार आहे. हे शीर्ष सहाकर, पणन व वस्त्रोद्योग विभागात अंतर्भूत आहे. या १००० कोटी रुपयांच्या पुरवणी

मागणीचा उपयोग आदिवासी समाजासाठी होणार आहे असे म्हटले असले, तरी आदिवासी उपयोजने अंतर्गत येणाऱ्या इतर योजनांनांच्या निधीला यामुळे काट लागणार हे निश्चित.

- वस्तू व सेवा कराच्या (GST) अंमलबजावणीमुळे होणाऱ्या वित्तीय तुटीवर मात करण्यासाठी महानगरपालिकांना राज्य सहाय्याची तरतूद करण्यासाठी ७ हजार ३५६ कोटी ५३ लाखांची तरतूद करण्यात आली आहे. स्थानिक संस्था कर, मुंबईचा जकात कर व इतर कर रद्द झाल्यामुळे भरपाई देण्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. राज्य शासनाला दर वर्षी ही रक्कम द्यावी लागणार आहे. मात्र शासन मुळ अर्थसंकल्पात तरतूद न करता स्थानिक संस्था कर (LBT) रद्द केल्या पासून ती पुरवणी मागण्यांद्वारे भागवत आहे. मुळ अर्थसंकल्पात याची तरतूद करणे गरजेचे आहे.

- ३३ हजार ५३३ कोटी ८५ लाख रुपयांच्या पुरवणी मागणी पैकी शेतकरी कर्ज माफी व मुंबईसह इतर महानगरपालिकांना वित्तीय सहाय्य देण्यासाठी, २८ हजार कोटी (८३%) रक्कमेचा समावेस आहे.

- आकस्मिकता निधीतून रु. ४४ कोटी ६१ लाख काढण्यात आले असून सर्वात जास्त रु. ४३ कोटी ४८ लाखांची रक्कम सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागांतर्गत काढण्यात आली आहे. ही रक्कम 'कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी' काढण्यात आली आहे.

- जुलै पुरवणी मागण्यांमध्ये एकूण २४ विभागांच्या ५७ मागण्या असून त्यात १८९ बाबी अंतर्भूत आहेत.
- जुलै, २०१७ मध्ये सादर केलेल्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रात आकस्मिकता निधीतून २ बाबींअंतर्गत काढण्यात आलेली रक्कम रु. ४४ कोटी ६१ लाख आहे, जी पुरवणी मागणीच्या तुलनेत ०.१३ टक्के इतकी आहे.
- खर्चाचे पूरक विवरणपत्र जुलै, २०१७ मध्ये रु. ३३ हजार ५३३ कोटी ८५ लाखांच्या पूरक मागण्या सादर केलेल्या २४ विभागांपैकी १) सहकार, पणन व वस्त्रोद्योग, २) नगर विकास ३) सार्वजनिक आरोग्य, ४) आदिवासी विकास, या ४ विभागांनी सर्वात जास्त रु. ३० हजार ४१२ कोटी ७५ लाखांच्या पूरक मागण्या सादर केल्या असून त्यांचे एकूण पूरक मागणीत प्रमाण ९०.६९ टक्के आहे.

(स्त्रोत:खर्चाचे पूरक विवरणपत्र जुलै, २०१७ व राज्याचे वित्त विषयक विवरणपत्र, २०१७-१८)

# जुलै, २०१७ च्या महसुली व भांडवली पुरवणी मागण्या

*तक्ता क्र. १* *( रु. कोटीत )*

| मागण्यांचा प्रकार | भारित | दत्तमत | एकूण |
|---|---|---|---|
| महसुली | १६५.६० | ३१,८६६.६५ | ३२,०३२.२६ |
| भांडवली | १.१५ | १,५००.४४ | १,५०१.५९ |
| एकूण | १६६.७५ | ३३,३६७.०९ | ३३,५३३.८५ |

*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, जुलै २०१७*

- जुलै २०१७ मध्ये वर्ष २०१७-१८ साठी रु. ३३ हजार ५३३ कोटी ८५ लाखांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत, यामध्ये दत्तमत स्वरुपाच्या रु. ३३ हजार ३६७ कोटी ०९ (९९.५१ टक्के) लाखांच्या पुरवणी मागण्या आहेत. तर भारित स्वरुपाच्या रु. १६६ कोटी ७५ (०.४९ टक्के) लाखांच्या पुरवणी मागण्यांचा समावेश आहे.

## मुळ मागणीच्या तुलनेत जुलै पुरवणी मागणीचे प्रमाण ११.१६ टक्के

*तक्ता क्र. २* *(रुपये कोटीत)*

| मागण्या | रक्कम | एकूण मागणीशी प्रमाण | मुळ मागणीशी प्रमाण |
|---|---|---|---|
| मार्च, २०१७ मूळ मागणी | ३,००,३९७.६६ | ८९.९६% | १००.००% |
| जुलै, २०१७ पूरक मागणी | ३३,५३३.८५ | १०.०४% | ११.१६% |
| एकूण मागणी | ३,३३,९३१.५१ | १००.००% | - |

*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, जुलै २०१७*

- राज्याचा एकूण अर्थसंकल्प (मुळ मागणी) रु. ३ लाख ३९७ कोटी एवढा होता. जुलै, २०१७ मध्ये सादर केलेल्या पूरक मागण्या मिळून रु. ३ लाख ३३ हजार ९३१ कोटी ५१ लाख झाला आहे.
- मुळ मागणीशी तुलना करता जुलै, २०१७ मध्ये करण्यात आलेल्या पुरवणी मागणीचे प्रमाण ११.१६% एवढे मोठे आहे.

# सर्वाधिक पुरवणी मागण्या केलेले विभाग

*तक्ता क्र. ३* *(रु. कोटीत)*

| विभाग व विभागांची संख्या | पुरवणी मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी | मुळ मागणी | पुरवणी मागणीचे मुळ मागणीशी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| **सहकार,पणन व वस्त्रोद्योग** | १ | १९,५७७.३० | १,६८२.५७ | ११६३.५३ |
| **नगर विकास** | ५ | ७,४१३.६४ | ११,०६९.८२ | ६६.९७ |
| **सार्वजनिक आरोग्य** | १ | १,७१०.०४ | ८,१९५.१८ | २०.८६ |
| **आदिवासी विकास** | १ | १,१६३.३६ | ८,८१७.२८ | १३.१९ |
| **४** | **८** | **२९,८६४.३४** | **२८,३३३.२४** | **१०५.४०** |

*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, जुलै २०१७ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज-भाग - २*

- **खर्चाचे पूरक विवरणपत्र जुलै, २०१७ मध्ये रु. ३३ हजार ५३३ कोटी ८५ लाखांच्या पूरक मागण्या सादर केलेल्या २४ विभागांपैकी १) सहकार,पणन व वस्त्रोद्योग, २) नगर विकास, ३) सार्वजनिक आरोग्य, ४) आदिवासी विकास या ४ विभागांनी रु. २९ हजार ८६४ कोटी ३४ लाखांच्या पूरक मागण्या सादर केल्या असून त्यांचे एकूण पुरवणी मागणीशी प्रमाण ८९.०५ टक्के आहे.**
- **सहकार, पणन व वस्त्रोद्योग या विभागाने सर्वाधिक रु.१९ हजार ५७७ कोटी ३० लाखाची पुरवणी मागणी केली असून एकूण पुरवणी मागणीत त्याचे प्रमाण ५८.३८ टक्के आहे.**
- **सहकार, पणन व वस्त्रोद्योग व आदिवासी विकास विभागांतर्गत २० हजार कोटी रुपये 'छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७' साठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.**

# आकस्मिकता निधीतून काढलेले ४४ कोटी ६१ लाख

## त्यापैकी सहकार विभागाचा वाटा ४३ कोटी

*तक्ता. क्र. ४* *(रु. कोटीत)*

| विभाग | बाब क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|---|
| **सहकार** | १६२ | कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य | ४३.४८ |
| **विधि व न्याय** | १०२ | हिंगणवार, जिल्हा वर्धा येथे जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायालय व दिवाणी न्यायालय स्थापन करणे. | ०१.१३ |
| | | **एकूण** | **४४.६१** |

*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, जुलै २०१७*

✍ वर्ष २०१७-१८ साठी अर्थसंकल्पीय अधिवेशनात एकूण रु. ३३ हजार ५३३ कोटी ८५ लाखांच्या पुरवणी मागण्या करण्यात आल्या आहेत त्यापैकी आकस्मिकता निधीतून २ विभागाअंतर्गत रु. ४४ कोटी ६१ लाख काढण्यात आले आहेत. एकूण पुरवणी मागण्यांमध्ये याचे प्रमाण ०.१३ टक्के आहे.

✍ आकस्मिकता निधीतून सर्वात जास्त रु. ४३ कोटींची रक्कम सहकार विभागांतर्गत काढण्यात आली आहे. ही रक्कम कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय्य देण्यासाठी काढण्यात आली आहे.

## २९ हजार ५२८ कोटी ३० लाखांच्या मागण्या विनाचर्चा मंजूर होणार!

### दोन दिवसात रु. ४ हजार ५ कोटी ५५ लाखांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा!

*तक्ता. क्र. ५* *(रु. कोटीत)*

| चर्चा होणारे विभाग (८) | पुरवणी मागण्यांची संख्या | पुरवणी मागणी | मूळ मागणी | पुरवणी मागणीचे मूळ मागणीशी % |
|---|---|---|---|---|
| **३१ जुलै, २०१७** | | | | |
| गृह | ७ | ३७८.९९ | १७,००७.०२ | २.२२ |
| महसूल व वन | २ | ४७.५९ | १२,३४५.०९ | ०.३८ |
| कृषि व पदुम | ५ | ३०२.७७ | ८,००४.६२ | ३.७८ |
| शालेय शिक्षण | ३ | ५०.७३ | ४८,८४४.५७ | ०.१० |
| **१ ऑगस्ट, २०१७** | | | | |
| ग्रामविकास व जलसंधारण | २ | २४३.५० | १७,६८५.४४ | १.३७ |
| अन्न व नागरी पुरवठा व ग्रा. | ३ | १०८.५७ | ५,९१८.६९ | १.८३ |
| सार्वजनिक आरोग्य | १ | १,७१०.०४ | ८,१९५.१८ | २०.८६ |
| आदिवासी विकास | १ | १,१६३.३६ | ८,८१७.२८ | १३.१९ |
| एकूण | २४ | ४,००५.५५ | १,२६,८१७.८९ | ३.१५ |
| विनाचर्चा मंजूर होणारे विभाग (१६) | ३३ | २९५२८.३० | - | - |

*स्त्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र, जुलै २०१७ व विभागांचे खर्चाचे तपशीलवार अर्थसंकल्पीय अंदाज - भाग -२*

✍ महसूल व वन, कृषि व पदुम, शालेय शिक्षण, ग्रामविकास व जलसंधारण, अन्न व नागरी पुरवठा, सार्वजनिक आरोग्य व आदिवासी विकास विभाग या ८ विभागांच्या रु.४ हजार ५ कोटी ५५ (११.९४%) लाखांच्या पुरवणी मागण्यांवर चर्चा होणार असून *१६ विभागांच्या रु. २९ हजार ५२८ कोटी ३० (८८.०६%) लाखांच्या मागण्या विनाचर्चा मंजूर होतील.*

# फडणवीस सरकारच्या पूरवणी मागण्या पोहचल्या १ लाख १४ हजार ३६७ कोटींवर

## जुलै, २०१७च्या अधिवेशनात सादर केल्या ३३ हजार ५३३ कोटींच्या विक्रमी पुरवणी मागण्या

*आलेख. क्र. २* *(रु. कोटीत)*




*स्रोत: खर्चाचे पूरक विवरण पत्र- डिसेंबर, २०१४ ते जुलै २०१७*

- युती शासनाने सत्तेवर आल्यापासून म्हणजे डिसेंबर, २०१४ पासून जुलै, २०१७ पर्यंत ९ वेळा पुरवणी मागण्या सादर केल्या. या सर्व पुरवणी मागण्यांची एकूण रक्कम १ लाख १४ हजार ३६७ कोटी ४८ लाख रुपये झाली आहे.
- हेच शासन विरोधी बाकांवर असताना तात्कालीन आघाडी शासनाला वाढत्या पुरवणी मागण्यांबाबत, राज्यावरील वाढत्या कर्जाबाबत, राज्यातील आर्थिक बेशिस्तीबाबत सतत ओरडत होते. मात्र स्वत: सत्तेवर आल्यानंतर विक्रमी पुरवणी मागण्या करीत आहे, हे पाहता राज्याचे आर्थिक नियोजन डळमळले आहे.
- मार्च, २०१५ व मार्च २०१६ वगळता प्रत्येक अधिवेशनात पूरक मागण्यांसाठी ८ हजार ते ३३ हजार कोटी रुपयांची रक्कम काढण्यात आली आहे.
- जुलै, २०१७ मध्ये ३३ हजार ५३३ कोटी रक्कम काढण्यात आली आहे. ही रक्कम युती शासनाने नोव्हेंबर २०१४ ते जुलै, २०१७ या कालावधीत सादर केलेल्या पुरवणी मागण्यांमध्ये सर्वात मोठी पुरवणी मागणी ठरली आहे.